जळगाव दि. २ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागास भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाद्वारे **"योग व ध्यानाद्वारे पौंगडावस्थेतील आदिवासी मुलींमधील मासिक पाळी समस्यांवर उपाय योजना करणे"** या प्रकल्पाला संशोधनासाठी ३० लाख ७० हजार नऊशे रुपयाचे अनुदान मंजूर झाले असून १४ लाख ५० हजार रूपयांचा अनुदानाचा पहिल्या हप्ता प्राप्त झाला आहे.

विद्यापीठाच्या योग शास्त्र विभागाद्वारे स्वास्थ संवर्धनासाठी योगशिबीर, योगवर्ग, भारताच्या वैद्यकीय पद्धती योगाआयुर्वेदद्वारे योगोपचार, योगथेरेपी केले जातात. या विभागाद्वारे एम.ए. योगशास्त्र हा दोन वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रम व इतर अभ्यासक्रम राबविले जातात.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाद्वारे **सायन्स अँड हेरीटेज (SHRI)** या अंतर्गत संशोधन प्रकल्पांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने हा प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. हा प्रकल्प तीन वर्षासाठी (एप्रिल 2025 ते मार्च 2028) आहे. या प्रकल्पांतर्गत आधुनिक यंत्रसामुग्री / उपकरणांचा उपयोग करून फिल्डवर्क केले जाणार आहे. सुरुवातीला विद्यापीठ परिक्षेत्रातील आदिवासी (जळगाव,धुळे, नंदुरबार) मुलींचे सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यावरून निवड केलेल्या 100 मुलींना योग शिक्षकांद्वारे सहा-सहा महिन्यांची योग थेरेपी दिली जाणार असून त्याचा प्रभाव तपासला जाणार आहे.

विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाची स्थापना सन 2023 मध्ये झाली असून अल्पावधीतच पहिल्याच प्रयत्नात भारत सरकारच्या विज्ञान तंत्रज्ञान या प्रतिष्ठित संस्थेद्वारे अनुदान प्राप्त झाल्याने विद्यापिठाचा योगशास्त्र विभागाची ही उल्लेखनीय बाब आहे. या प्रकल्पाचे प्रमुख संशोधक इंजि. राजेश पाटील असून सहसंशोधक प्रा.किशोर एस. विश्वकर्मा व डॉ. लिना चौधरी हे आहेत,

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २ मे, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

कुलसचिव